REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
व्यवस्थापकापाशी चौकशी
करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाविलास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. [illegible]
(टपाल हंशील माफ.)
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गों. काळे.

वर्ष ६ | पुणें, बुधवार, तारीख ११ सप्टेंबर, १९४० | अंक ३७

चेअरमन,
व्ही. एन. पाटील, एस्क्वायर,
एम. ए. (कँटब), बार-ॲट-लॉ,
माजी एम. एल. सी.

मॅनेजिंग एजंट,
पी. आय. पाटील ॲंड सन्स

पंचवार्षिक बोनस
तहाहयात रु. ६० दर हजारी हयातींत रु. ५०

प्रगतीच्या पथावर असलेली
दि
ग्रेट सोशल लाईफ ॲण्ड जनरल ॲशुरन्स लिमिटेड.
ब्रँच ऑफिस—लक्ष्मीरोड, पुणें. S एजन्सीकरितां आजच लिहा. S हेड ऑफिस—जळगांव, पू. खा.

पूर्ण स्वदेशी.
कमी प्रिमियम, जास्त नफा,
विमेदारांस अत्यल्प हप्त्यांत
भरपूर सवलती
आधुनिक शास्त्रशुद्ध विम्याच्या उपयुक्त
विविध योजना. सविस्तर माहिती मागवा.

के. जी. चौधरी,
लाईफ मॅनेजर.

के. एच. सुराणा, विमा केसरी,
जनरल मॅनेजर.

महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर

महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

# विविध माहिती

### मध्यवर्ती सरकारच्या कचेऱ्यांचें स्थलांतर

मध्यवर्ती सरकारच्या कचेऱ्या सिमल्यास ता. ११ ऑक्टोबर रोजीं बंद होऊन १२ ऑक्टोबर रोजीं दिल्लीस चालू होतील.

### बँकांच्या नफ्यापैकीं ५% युद्धफंडास

त्रिचूर ( कोचीन ) येथील स्थानिक बँकांच्या व कंपन्यांच्या डायरेक्टरांची एक सभा नुकतीच भरली होती, तीमध्यें तेथील बँकांनीं व कंपन्यांनीं आपल्या गेल्या वर्षाच्या नफ्यापैकी ५% रकम युद्धफंडास द्यावी असें ठरलें.

### हिंदुस्थान सरकारच्या ट्रेझरी बिलांवर १० आ. ७ पै व्याजाचा दर

| | |
|---|---|
| विक्रीची तारीखः | ३ सप्टेंबर, १९४० |
| रकमः | १ कोटि रु. |
| सरासरी व्याजाचा दरः | १० आ. ७ पै |

### पैसे पाठविण्याची सुलभता

पैसे एका ठिकाणाहून दुसरीकडे पाठविण्याचे बाबतींत रिझर्व्ह बँकेनें मध्यवर्ती व प्रांतिक सरकारें, ब्रह्मदेशाचें सरकार व इंपीरिअल बँक ह्यांचे सहकार्यानें एक योजना केली आहे, ती १ ऑक्टोबरपासून अंमलांत येईल. सावकार व श्रॉफ ह्यांसहि त्या संबंधांत कांहीं सवलती मिळणार आहेत.

### कपाशीचें उत्पादन

कपाशीच्या जागतिक वार्षिक उत्पादनापैकीं २०% उत्पादन ब्रिटिश साम्राज्यांत होतें. १९३९ सालीं झालेल्या २ कोटि, ९८ लक्ष गाठींच्या उत्पादनांत हिंदी कपाशीचा वाटा ५११/२ लक्ष गाठींचा होता.

### मुंबईच्या म्युनिसिपल शाळा

मुंबईच्या म्युनिसिपल शाळांतील विद्यार्थ्यांची संख्या १९३९–४० मध्यें १,०५,९७९ भरली. प्रत्येक विद्यार्थ्यामागें ३२ रु. ८ आणे खर्च आला. एकूण २,९३३ शिक्षकांनीं ह्या विद्यार्थ्यांस शिकविलें.

### इन्स्टिट्यूट ऑफ ॲक्चुअरीजची परीक्षा

इन्स्टिट्यूट ऑफ ॲक्चुअरीजची प्रिलिमिनरी परीक्षा २७ व २८ जानेवारी १९४१ रोजीं होणार आहे. अर्ज पाठविण्याची शेवटची तारीख १२ नोव्हेंबर, १९४० ही आहे.

### आय. सी. एस. चे उमेदवार

आय. सी. एस. साठी हिंदुस्थानांतून निवडलेल्या उमेदवारांचें पहिलें १२ महिन्यांचें प्राथमिक शिक्षण युद्ध चालू असेपर्यंत इंग्लंडमध्यें होऊं शकणार नाहीं, ह्याकरितां त्याची व्यवस्था हिंदुस्थानांत करण्यांत आली आहे.

### रेल्वेजच्या व्यवस्थेचा खर्च

हिंदी सरकारी रेल्वेजचा व्यवस्थेचा खर्च जगांतील प्रमुख रेल्वेजच्या व्यवस्थेच्या खर्चाचे मानानें अत्यल्प आहे, हें दर्शविणारे खालील आंकडे प्रसिद्ध झाले आहेत. एकूण उत्पन्नाशी व्यवस्थेच्या खर्चाचें प्रमाण हिंदुस्थानांत १९३८–३९ मध्यें ५१% पडलें. ब्रिटिश रेल्वेजवर तें १९३८ सालीं ८५.७%, कॅनेडियन पॅसिफिक रेल्वेवर ८५.४१% कॅनेडियन नॅशनल रेल्वेजवर ९६.६७%, अमेरिकेंतील प्रमुख रेल्वेजवर ७६.३५% व जर्मन सरकारी रेल्वेजवर ९२.७५% पडलें. हिंदी रेल्वेजच्या खर्चांत घसाऱ्याची रकम मिळविली तर खर्चाचें प्रमाण ५१% चें ६६% होतें.

### अपेक्षेपेक्षा उत्पन्न अधिक

हिंदुस्थान सरकारच्या उत्पन्न-खर्चाचे १९३९–४० सालचे पक्के हिशोब आतां झाले आहेत, त्यावरून असें दिसतें कीं ह्या सालीं हिंदुस्थान सरकारचें उत्पन्न ९४ कोटि, ३३ लक्ष रुपये झालें. दुरुस्त अंदाजापेक्षा हा आकडा ६ कोटि, ५६ लाखांनीं मोठा आहे.

### डिफेन्स सेव्हिंग्ज तिकिटें

गरीबांसहि हिंदुस्थान सरकारचीं डिफेन्स सेव्हिंग्ज सर्टिफिकिटें घेतां यावीं, यासाठीं सरकारनें ४ आणे, ८ आणे व रुपया ह्या किंमतीचीं तिकिटें काढलीं आहेत तीं पोस्टांत विकत मिळतील. १० रुपये किंमतीचीं तिकिटें जमलीं, म्हणजे त्यांचे बदली पोस्ट ऑफिस १० रुपयांचें सेव्हिंग सर्टिफिकेट देईल.

### बडोदें संस्थानाचें अंदाजपत्रक

बडोदें संस्थानाचें १९४०-४१ मधील अपेक्षित उत्पन्न २ कोटि, ५५ लक्ष असून खर्च २ कोटि, ४४ लक्ष होईल, असा अंदाज आहे.

### जगांत सर्वांत मोठा बोगदा

जगांतील सर्वांत मोठा बोगदा खणण्याचें काम चालू आहे. अर्थात् तें अमेरिकेंतच आहे, हे उघड आहे. गेलीं दोन वर्षें सहा हजार लोक ह्या कामांत गुंतलेले आहेत. न्यूयॉर्क शहरास प्रत्यहीं आणखी ५१/२ कोटि गॅलन पाण्याचा पुरवठा ह्या बोगद्यांतून होईल. नळांतून पाणी आणण्यापेक्षा बोगद्यांतून तें आणण्यांत फायदा असा, कीं त्यासाठीं नंतर आणखी कांहींहि खर्च करावा लागणार नाहीं. बोगद्यावर किमान १५० फूट दगडी वेष्टन असल्यानें व तो वर्तुळाकार आणि आंतून२फूट रुंदीच्या सिमेंट कॉंक्रीटनें मढवलेला असल्यानें, बोगदा फुटण्याची भीति नाहीं. कार्ट्झच्या दगडांतून हा बोगदा खणला जात आहे, त्यामुळें कामगारांस सिलिकॉसिस हा रोग होण्याची भीति आहे. खाणींतून काम करणारांस ह्या रोगाचा भयंकरपणा परिचित असतो. कॅट्स्किल पर्वतापासून हडसन नदीपर्यंत जाणारा ८१ मैल लांबीचा हा बोगदा खणण्यास प्रारंभ करण्यापूर्वीच ह्या रोगाचा उद्भव होऊं नये, अशी व्यवस्था करण्यांत आली, त्यामुळें सिलिकॉसिसला तेथें अद्याप एकहि बळी मिळाला नाहीं.

### गुन्हेगार जातींच्या वसाहती

गुन्हेगार जातींच्या मुंबई प्रांतांतील वसाहतींत मार्च, १९४० अखेर ६,२१५ लोक होते. ही संख्या त्या पूर्वींच्या वर्षाच्या मानानें १,१२५ नें कमी आहे. वसाहतींतील लोकांस गिरण्या व कारखाने ह्यांत काम देण्यांत येतें. कपास कापडाच्या गिरण्यांतून काम मिळवून देणें आतां अतिशय अवघड झालें आहे. विजापूर येथील वसाहतींत हातानें सूत काढण्याचें काम प्रयोग ह्या दृष्टीनें प्रथम सुरू करण्यांत आलें. गदग, सोलापूर, अहमदाबाद व बार्शी येथील वसाहतींतहि नंतर ह्याचा प्रसार झाला. काम नसलेल्या स्त्रिया आपल्या फुरसतीच्या वेळीं हें काम करतात. ६ व १२ ह्यांचेमधील वयाच्या मुलांस शिक्षण सक्तीचें आहे. सर्व वसाहतींवर मिळून मुंबई सरकारनें २ लक्ष, ८४ हजार रुपये खर्च केला.

अनुक्रमणिका

| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | ४३४ |
| २ युद्धाचें गेलें वर्ष ... | ४३५ |
| ३ मुंबई शहराचा पाणी-पुरवठा ... | ४३६ |
| ४ स्फुट-विचार ... हिटलरचें आव्हान–मि. चर्चिल ह्यांचें ठसठशित उत्तर–रुमानिया जर्मनीच्या जाळ्यांत–जपानमधील कारखाने | ४३७ |
| ५ सहकारी शेत माल विक्रीच्या व्यवस्थेचें शिक्षण | ४३९ |
| ६ पायोनियर डाइंग हाउसचा वाढदिवस ... | ४४० |
| ७ सहकारी बँकांचे अहवाल | ४४१ |
| ८ मुंबई बंदराचा गळिताच्या पदार्थांचा व्यापार | ४४२ |
| ९ निवडक बाजारभाव | ४४३ |

अर्थ

बुधवार, ता. ११ सप्टेंबर, १९४०

## युद्धाचें गेलें वर्ष

इंग्लंडनें जर्मनीशीं युद्ध पुकारल्यास एक वर्ष झालें आहे. ह्या अवधींत झालेल्या घडामोडींमुळें दुसऱ्या वर्षाच्या प्रारंभीं परिस्थिति कोणत्या प्रकारची आहे ह्याचा आढावा घेणें आवश्यक आहे. हिटलरनें प्रस्तुत युद्धाचें जणूं काय एक वेळापत्रक तयार केलें होतें आणि त्यास अनुसरून एकामागून एक ह्याप्रमाणें शेजारचे देश पादाक्रांत करण्याचा त्याचा कार्यक्रम चालू होता. डेन्मार्क, हॉलंड, बेल्जम व फ्रान्स हे देश जर्मन वर्चस्वाखालीं थोड्या काळांत आले. नॉर्वेचें रक्षण करण्यासाठीं पाठवलेली चिमुकली ब्रिटिश फौज ह्या देशाच्या अवघड भौगोलिक परिस्थितीमुळें माघारी आणावी लागली. ह्याचें उत्तेजन मिळून हिटलरनें आपला मोर्चा फ्रान्सकडे फिरवला. बेल्जममध्यें स्थानिक फ्रेंच व ब्रिटिश फौजा आणि विमानें ह्यांस जर्मनीच्या स्वारीची प्रगति थोपवून धरतां येईल असें एकाकाळीं वाटत होतें. मॅजिनो तटबंदी अभेद्य असल्यामुळें ह्या बाजूकडून शत्रु फ्रान्समध्यें घुसण्याची भीति नव्हती आणि इटलीनें आपली तटस्थ वृत्ति सोडली नव्हती. फ्रेंच सेनानींचे बेल्जमच्या सरहद्दीवरील डावपेच चुकले. आणि जर्मनीच्या चिलखती गाड्या झपाट्यानें पुढें सरसावल्या. फ्रेंच व बेल्जम सैन्यें हळुहळु मागें हटून येत असतां ब्रिटिश विमानांनीं शत्रूस सतावून सोडण्यास कमी केलें नाहीं. ब्रिटिशांची तीन-चार लाख फौजहि बेल्जम व फ्रेंच सैन्यांच्या बरोबरीनें जर्मनीशीं लढत होती आणि शत्रूची दक्षिण व पश्चिम ह्या देशांकडे होणारी प्रगति कुंठित करण्यास सहाय देत होती. इकडे फ्रेंच फौजा कच खाऊन मागें मागें येत होत्या आणि मॅजिनो तटबंदीचा सुरक्षितपणा संशयात्मक होऊं लागला. अशा आणीबाणीच्या प्रसंगीं बेल्जमच्या राजानें एकाएकीं शस्त्र खालीं ठेवण्याचा हुकूम आपल्या सैन्यास सोडला आणि तो स्वतः जर्मन संरक्षणाखालीं गेला.

गेल्या वर्षीतल्या युद्धाच्या घडामोडींतला हा मोठा भयंकर प्रसंग होय. ब्रिटिशांनीं आपली फौज निराधार रीतीनें कचाट्यांत सापडली असतां विलक्षण पराक्रम करून डंकर्कच्या बंदरांतून मोठ्या शिताफीनें ती काढून नेली. ह्यानंतर फ्रान्समधील लढाई पुनश्च चिकाटीनें चालू होईल हीं आशा फ्रेंच सरकारनें युद्ध तहकुबी पत्करून विफल केली. युद्धांतलें हें दुसरें भयंकर गंडांतर होय. इटलीनें तटस्थवृत्ति ऐन वेळीं झुगारून देऊन जर्मनीचे बाजूनें युद्धांत उडी घातली, ह्या योगानें तर इंग्लंडची परिस्थिति अगदीं निर्वाणीची झाल्या सारखें दिसलें. परंतु इंग्लंडनें ह्या प्रसंगीं अप्रतिम धडाडी व चिकाटी दाखवून जर्मनीच्या व इटलीच्या हल्ल्यांस तोंड देण्याचा निश्चय केला, तो कौतुकास्पद होता. हिटलरशाहीचा तिटकारा सबंद जगास वाटत होता आणि तिचा प्रतिकार स्वतःच्या जोरावर करावयास सिद्ध झालेल्या ब्रिटिश राष्ट्रास सहानुभूति व सहाय मिळणें स्वाभाविक होतें. आपल्या वैमानिक बळाच्या जोरावर इंग्लंडला आपण तेव्हांच जेरीस आणूं अशी घमेंड हिटलरला वाटत होती. त्यानें इंग्लंडवर वैमानिक हल्ल्यांचें सत्र चालू केलें. पण इंग्लंडनें स्वसंरक्षणाची एवढी जबरदस्त तयारी केली होती कीं, जर्मन विमानांस अपेक्षित यश मिळूं शकलें नाहीं. विमानें व दारूगोळा ह्यांचें उत्पादन प्रत्यक्ष इंग्लंडमध्यें व साम्राज्यांतील इतर देशांमध्यें झपाट्यानें वाढवण्यांत आलें. अमेरिकेची नुसति सहानुभूतिच नव्हे तर युद्ध-सहाय इंग्लंडला मिळूं लागल्या कारणानें ब्रिटिशांचें पारडें जड होत गेलें आणि त्या प्रमाणांत जर्मनीची आशा मावळण्याच्या पंथास लागली. भूमध्य समुद्रांत ब्रिटिश आरमाराचें वर्चस्व प्रस्थापित झालें आणि इटलीच्या गमजा ह्या बाजूस चालू शकलेल्या नाहींत. ब्रिटिश आरमार आणि वैमानिक दळ ह्यांनीं इटलीची आफ्रिकेंतली प्रगति थोपवून धरली असून ब्रिटिशांचें बळ दुभंग करण्याचा हिटलरचा डाव अयशस्वी ठरला आहे.

सारांश, गेल्या वर्षांत ब्रिटिश फौजेस दोनदां माघार घ्यावी लागली आणि फ्रान्सचा आधार सुटल्यामुळें युद्धाची जबाबदारी स्वतःच्या शिरावर घ्यावी लागली असली तरी दुसऱ्या वर्षाच्या प्रारंभीं असें निश्चयानें म्हणतां येतें कीं, लढाऊ बलाधिक्याचा काटा आतां इंग्लंडच्या बाजूस स्पष्टपणें झुकत आहे. हिटलरनें कितीहि बढाया मारल्या आणि वारंवार धमक्या दिल्या तरी त्यानें योजलेल्या इंग्लंडवरील स्वारीचा पहिला बार फुसका निघाला आहे. जर्मनीची सरहद्द आतां फ्रेंच किनाऱ्यापर्यंत येऊन पोहोंचली आहे ही गोष्ट एका दृष्टीनें शत्रूस अनुकूल असली तरी दुसऱ्या दृष्टीनें ती त्यास प्रतिकूल अशीच आहे. ब्रिटिश विमानें इंग्लंडचा बचाव तर करीत आहेतच, पण त्या बरोबर त्यांनीं फ्रान्सच्या किनाऱ्यावरील जर्मन विमानगृहांचा धुव्वा उडवण्याचा क्रम आरंभला आहे, एवढेंच नव्हे तर, प्रत्यक्ष बर्लिनवर हल्ले चढवण्याचा सपाटा चालवला आहे. आपल्या लोकांस स्वतःच्या विजयाच्या खोट्या बातम्या प्रत्यहीं चारण्यास चटावलेल्या जर्मन सत्ताधाऱ्यांस हे हल्ले व त्यांचे परिणाम झाकून ठेवणें अशक्य होत आहे. हिटलरनें नुकतेंच केलेलें भाषण बढाई व धमक्या ह्यांनीं पूर्वीप्रमाणें भरलेलें असलें तरी त्यावरून युद्धास प्रतिकूल वळण लागलें असल्याची कबुली प्रतीत झाल्यावांचून रहात नाहीं. एखाद्या बहकलेल्या माणसाप्रमाणें हिटलर आपलें शक्तिसर्वस्व इंग्लंडच्या विरुद्ध पणास लावील, पण त्याच्या आशावादाचा नूर पालटला आहे, हें निश्चित आहे. ब्रिटिश लोकांस कांहीं काळपर्यंत जर्मन विमानांपासून उपद्रव होईल आणि स्वार्थत्याग करावा लागेल. तथापि, अखेरचा विजय आतां जवळ जवळ येत चालला आहे, ह्यांत संशय नाहीं.

# मुंबई शहराचा पाणी-पुरवठा

सन १८४५ पर्यंत मुंबई शहरास पाण्याचा दुष्काळ माहीत नव्हता. लहान तळीं व विहिरी ह्यांच्या पाण्याचा पुरवठा भरपूर होता. १८४५ च्या सुमारास पाण्याचा तुटवडा भासूं लागला व सरकारनें त्या संबंधांत सूचना करण्यासाठी अनेक अधिकारी व कमिट्या ह्यांची नेमणूक केली. शहरांतील कांहीं खासगी विहिरी सरकारनें स्वतःकडे घ्याव्या, नौरोजी टेकडी, मलबार टेकडी, वगैरे ठिकाणीं तळीं बांधावीं, ट्रॉम्बे येथें तलाव बांधावा, धोबी तलाव, माहीम वगैरे ठिकाणीं पाणी साठवावें, इत्यादि त्यांनीं सूचना केल्या. कोर्ट ऑफ पेटि सेशन्सचें लक्ष सरकारनें पाण्याच्या दुष्काळाकडे वेधलें तेव्हां "लोकांनीं जरूरीपेक्षा अधिक पाणी पिऊं नये व पाणी पितांना तें सांडूं नये, असा सरकारनें जाहीरनामा काढावा" अशी कोर्ट ऑफ पेटि सेशन्सनें सरकारास शिफारस केली.

## विहार तलाव

कुर्ल्याशेजारील विहार तलावांतील पाणी मुंबईस आणण्याची योजना १८४६ सालीं आखण्यांत आली, ती थोड्या-फार फरकानें सुधारण्यांत येऊन सरकारी मंजुरीनंतर १८६० मध्यें पुरी झाली. यापूर्वीच्या काळांत, मुंबई शहरांत पाण्याची अतिशय टंचाई होती. १८५४ मध्यें जी. आय. पी. रेल्वेच्या आगगाड्यांतून व मचव्यांतून दररोज पाणी आणून मुंबईकरांची तहान भागवावी लागत असे! विहार तलावांतून ३२ इंची नळांतून मुंबईत पाणी आणलें त्यांमधून दररोज ७० लक्ष गॅलन पाणी मिळे. म्हणजे प्रत्येक मुंबईकराच्या वांट्यास सरासरीनें १० गॅलन पाणी येई. विहार योजनेस ८१½ लक्ष रुपये खर्च आला, त्यापैकी सरकारनें २० लक्ष रुपये दिले व बाकीचा खर्च मुंबई म्युनिसिपॅलिटीनें केला.

## तुळशी तलाव

विहार वॉटर वर्क्सचें पाणी पुढें पुरेनासें झालें व १८७२ सालीं तुळशी तलावाची योजना हातीं घेण्यांत आली. २४ इंची नळांतून तेथील पाणी मुंबईस आणून तें मलबार हिलवर साठवणें व तेथून ते कोटांत व कुलाब्यांत खेळवणें, अशी ही योजना होती, तिला ४० लक्ष रुपये खर्च आला. माहागांव रिझर्व्हॉयर १८८०-८४ मध्यें तयार झाला, तो १९२५-२७ मध्यें वाढविण्यांत आला, त्या सर्वांस १९½ लक्ष रुपये खर्च आला. वाढत्या लोकसंख्येबरोबर पाणी अधिकाधिक लागूं लागलें व १८८३ मध्यें तान्सा तलावाची योजना मुंबई कॉर्पोरेशननें मंजूर केली. तथापि, १८९१ मध्यें पाण्याचा दुष्काळ पडणार अशीं चिन्हें दिसूं लागलीं व १८९० मध्यें तातडीची उपाययोजना म्हणून पवाई योजना आधी पुरी करण्यांत आली. धरण बांधून पाणी साठवून तें विहार तळ्यांत पंप करणें, अशी ती योजना होती, तिला ६९ लक्ष रुपये खर्च आला. पुढें तान्सा योजना तयार झाल्यावर, पवाईचें पाणी शहरांत घेण्याचें बंद करण्यांत आलें. तेथील पाणी चांगलें नाहीं.

## तान्सा योजना

तान्सा तलाव सह्याद्रीचे पायथ्याशीं, मुंबईपासून ५५ मैलांवर ईशान्येस अटगाव रेल्वे स्टेशनपासून ९ मैल अंतरावर आहे. तान्साची मूळ योजना खालीलप्रमाणें होती:—धरण बांधून, १,८८५ कोटि गॅलन पाणी मावेल एवढा तलाव-तयार करणें, दररोज ४ कोटि गॅलन पाणी आणूं शकेल अशी ७ फूट × ६ फूट ह्या मापाचा २७ मैल लांब बांधकामाचा नळ डोंगरांतून बांधून काढणें, व मधल्या दऱ्याखोऱ्यांत २४ मैल लांब ४८ इंची एक नळ टाकून, दोन्ही टोकाचे दगडी नळ जोडणें. ह्या योजनेस १½ कोटि रुपये खर्च आला. पुढें १९१५ सालीं तान्सा तलावाची उंची १५ फूट वाढविण्यांत आली व आणखी एक लोखंडी नळ टाकण्यांत येऊन ज्यास्त पाणी वहाण्याची व्यवस्था करण्यांत आली. ह्यास ७०½ लक्ष रुपये खर्च आला. मुंबई शहरास आतां दररोज ५½ कोटि गॅलन पाणी मिळूं शकलें.

## तान्सा कंप्लीशन स्कीम

सरकार, सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट, पोर्ट ट्रस्ट, म्युनिसिपॅलिटी, इत्यादींनीं शहराचे वाढीसाठीं गेल्या महायुद्धाचे सुमारास अनेक योजना हातीं घेतल्या त्या यशस्वी होण्यास पाणीपुरवठ्याची अडचण पडूं नये, म्हणून मुंबई कॉर्पोरेशननें तान्सा कंप्लीशन योजना हातीं घेण्याचें ठरवलें. ह्या योजनेचें १९२७ सालीं काम पुरें झालें. तान्सा तलावाची उंची ५ फूट पुनः वाढविण्यांत आली व पाणी आणण्यासाठी आणखी नळ टाकण्यांत आले. वसईच्या खाडीवरून हे नळ नेण्यासाठी दोन लोखंडी पूल बांधण्यांत आले. त्यांवरून २४ फुटांचा वहातुकीसाठी रस्ताहि ठेवण्यांत आला. मुंबई दिल्लीचा प्रवास ह्या पुलांवरूनच होतो, व त्यामुळें १४ मैलांचें अंतर तुटतें. प्रत्येक मोटारीचे त्यामुळें १२ आण्यांचें पेट्रोल वाचलें, एवढाच हिशेब केला, तरी ह्या पुलामुळें झालेल्या लोकांच्या मोठ्या बचतीची कल्पना येईल.

## एकूण ९½ कोटि रुपये खर्च

मुंबई कॉर्पोरेशननें १८५९–१९३८ ह्या मुदतींत आपल्या पाणीपुरवठ्याच्या योजनांवर ९½ कोटि रुपये खर्च केले. त्यासाठीं काढाव्या लागलेल्या कर्जावरील व्याजासाठी व सिंकिंग फंडासाठी कॉर्पोरेशनला दरसाल ५१½ लक्ष रुपये बाजूस काढावे लागतात. व्यवस्थेचा वार्षिक खर्च ११½ लक्ष रुपये आहे. मुंबई शहराची पाणीपुरवठ्याची योजना जगांतील कोणत्याहि शहराच्या योजनेस मागें टाकणारी आहे. वेळोवेळीं मुंबई कॉर्पोरेशननें दाखविलेली जबाबदारीची जाणीव व दूरदर्शीपणा हीं इतर शहरांच्या म्युनिसिपॅलिट्यांनीं उचलण्याजोगीं आहेत.—(मुंबई कॉर्पोरेशनचे हायड्रॉलिक इंजिनिअर मि. नादिरशहा, ह्यांचे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे मासिकामधील लेखावरून)

---

## व्याजाचें प्रचंड नुकसान

हिंदुस्थानांत लोकांनीं एकूण ४० कोटि रुपये साठवून आपल्या संग्रहीं ठेवलेले आहेत, त्यावरील सुमारें १ कोटि, २० लक्ष रुपये व्याजास ते मुकत आहेत, असें रिझर्व्ह बँकेच्या एका अधिकाऱ्यानें नुकतेंच सांगितलें.

## भारत-इराण स्नेह-संवर्धन

इराण हें ४००० वर्षांच्या संस्कृतीच्या इतिहासाचें, एशियांतील अगदी प्राचीन राष्ट्र आहे, ह्या दृष्टीनें त्याच्याशीं स्नेहसंबंध वाढविण्याकरितां दिल्लीमध्यें एक भारत-इराण संस्कृति संस्था स्थापन करण्यांत आली आहे.

# स्फुट विचार

## हिटलरचें आव्हान

हिवाळयामध्यें थंडीमुळें जर्मन जनतेचे हाल होतात, ह्या बाबतींत लोकांस सहाय देण्यासाठी दरवर्षी पैसा जमवण्यांत येतो. ह्या विषयींच्या प्रचारास प्रारंभ होण्याचे प्रसंगीं यंदाहि हिटलरनें भाषण करून युद्धपरिस्थितीसंबंधानें उद्गार काढले. नेहमीप्रमाणें ह्या भाषणांत बढाई होतीच. तथापि, त्याचा सूर थोडा नरम पडलेला दिसला. फ्रान्स शरण येतांच जर्मन विमानें इंग्लंडवर चढाई करतील आणि थोड्या वेळांत तो देश व्यापून टाकतील अशी समजूत जर्मन जनतेमध्यें पसरवण्यांत आली होती. हिटलरची ही बढाई व्यर्थ ठरली आणि इंग्लंडवरील जर्मन विमानांच्या स्वाऱ्या अयशस्वी झाल्या; एवढेंच नाहीं, तर ब्रिटिश विमानांनींच उलट चढाई जर्मनीवर केली. जर्मन लोकांचें ह्या उफराट्या घटनेबाबत समाधान कसें करावयाचें हा अवघड प्रश्न जर्मन सत्ताधाऱ्यांच्या पुढें उभा राहिलेला आहे. "ब्रिटिशांच्या फौजा चटकन निसटून जातात आणि त्यांच्या बेटास चोहोंकडून समुद्राचें रक्षण आहे. तसें नसतें तर फ्रान्सप्रमाणें त्यांसहि आपण केव्हांच जिंकलें असतें" अशा अर्थाचें आपल्या अपयशाचें पोकळ समर्थन हिटलरला आपल्या परवाच्या भाषणांत करावें लागलें. ह्यावरून जर्मन जनताहि योग्य अनुमान काढीलच. व्यापाराच्या नाकेबंदीनें इंग्लंडनें सबंद युरोपची उपासमार करावी हें असह्य आहे हें त्याचें विधान जर्मनीच्या अपयशाचा पुरावाच आहे. इंग्लंडवरची स्वारी आपण लवकरच करणार अशी धमकी हिटलरनें पुन्हां दिली आहे, तिलाहि तोंड देण्याची इंग्लंडची तयारी आहे हें त्यानें विसरून चालावयाचें नाहीं. जगांत अखेर नाझी घटनेचा व पद्धतीचा विजय होणार आणि त्यांच्या मार्गांत येणाऱ्या सर्व राष्ट्रांचा आज नाहीं उद्यां निःपात होणार, ही हिटलरी प्रतिज्ञा खोटी करावयाची आणि मानवी संस्कृति व स्वातंत्र्य ह्यांचें हिटलरशाहीपासून रक्षण करावयाचें हा तर जर्मनीविरुद्ध लढणारांचा कृतनिश्चय आहे. अमेरिकेनें इंग्लंडशी सहकार्य करून आपल्या संरक्षणार्थ लढाऊ तयारी चालवली आहे तिचें समर्थन आतां निराळें करण्याचें प्रयोजन नाहीं. हिटलरच्या भाषणांत तें स्पष्ट व भरपूर आहे आणि त्याच्या योगानें जगांतील सर्व स्वातंत्र्यप्रिय लोकांचा निश्चय दृढ होणार आहे.

## मि. चर्चिल ह्यांचें ठसठशित उत्तर

इंग्लंडचे मुख्य प्रधान, मि. चर्चिल, ह्यांच्या हातीं युद्धाच्या व्यवस्थेचीं सूत्रें ब्रिटिश पार्लमेंटनें दिलीं आहेत, ही गोष्ट विजयाच्या अपेक्षेस पोषक आहेत ही जगामध्यें पसरलेली समजूत साधार असल्याविषयींचा पुरावा प्रत्यहीं येत आहे. स्पष्टवक्तेपणा, धडाडी व कार्यक्षमता हे त्यांचे प्रमुख गुण ब्रिटिश राष्ट्रास अत्यंत सहायक होत आहेत. त्यांनीं कॉमन्स सभेंत गेल्या आठवड्यामध्यें भाषण करून युद्धपरिस्थितीचें सिंहावलोकन केलें तें बोधप्रद व उत्तेजनदायक असेंच झालें. अमेरिकेकडून इंग्लंडला पन्नास डिस्ट्रॉयर जातींचीं जहाजें मिळालीं. त्यांच्या मोबदल्यांत इंग्लंडनें अमेरिकेच्या किनाऱ्यालगत कांहीं मोक्याचीं ठिकाणें विमानस्थळें म्हणून त्या राष्ट्रास दिलीं आहेत. हा सवदा अत्यंत फायदेशीर झाला असून त्याचे योगानें ग्रेट ब्रिटनचें नाविक बळ वाढलें आहे, ह्या गोष्टीचा मि. चर्चिल यांनीं आपल्या भाषणांत उल्लेख केला. अमेरिकेची सरहद्द अटलांटिक महासागरांत पुढें सरकली आणि त्या राष्ट्राचें वाढतें सहकार्य व्यावहारिक रीतीनें इंग्लंडला मिळालें. ह्यानें हिटलरचा हिरमोड झाला आहे ह्यांत शंका नाहीं. इंग्लंडवरील जर्मनीचे हल्ले, परतवण्याचे कामीं ब्रिटिश वैमानिक दलानें केलेल्या पराक्रमाचें कौतुक करून चालू महिन्यांत हे हल्ले अधिक निकराचे व ज्यास्त मोठ्या प्रमाणावर होतील त्यांस तोंड देण्याची तयारी लोकांनीं ठेवली पाहिजे अशी त्यांनीं दिलेली सूचना यथाकाल व यथायोग्य होती. भूमध्य समुद्राच्या पूर्व भागांत ब्रिटिश आरमार व फौजा ह्यांची तयारी अलीकडे विस्तृत प्रमाणावर केली असल्याचें मि. चर्चिल ह्यांनीं सांगितलें. इटली इजिप्तच्या बाजूस गडबड करणार असा रंग दिसल्यावरून ह्या हालचालींचा चांगला समाचार घेण्याची आपली जय्यत तयारी आहे ही गोष्ट त्यांनीं स्पष्ट केली. ब्रिटिश आणि जर्मन लोकांच्या निर्धाराची व चिकाटीची परीक्षा हिटलरच्या आव्हानाप्रमाणें व्हावयाचीच असेल तर स्वतंत्र बुद्धीच्या विचाराच्या व आचरणाच्या जनतेस बळजोबरीनें युद्धाच्या घाण्यास जोडलेल्या लोकांवर विजय मिळणें स्वाभाविक आहे हा मुख्य प्रधानांचा उद्गार अर्थपूर्ण आहे. सर्व जग पायाखाली तुडवण्यास उद्युक्त झालेल्या हिटलरला स्वातंत्र्यप्रिय राष्ट्रांच्या वतीनें मि. चर्चिल ह्यांनीं दिलेलें उत्तर समर्पक, आत्मविश्वासमूलक व निश्चयी वृत्तीचें आहे.

## रुमानिया जर्मनीच्या जाळयांत

बाल्कन प्रदेशांतील लहान लहान राष्ट्रांची एकवाक्यता होणें व एकसूत्री धोरण आखलें जाणें ह्या गोष्टींची अशक्यता पुन्हां एकवार सिद्ध झाली आहे. त्याचबरोबर भोंवतालच्या राष्ट्रांस आपल्या कक्षेंत आणून ठेवण्याच्या हिटलर व मुसोलिनी ह्यांच्या धोरणाचें आणखी एक पाऊल पुढें पडलें आहे. रुमानियाच्या राकेल तेलावर जर्मनीचा डोळा प्रथमपासून आहे आणि त्या देशामधून आपणांस युद्धसामुग्रीचा पुरवठा होण्याबद्दल हिटलरची खटपट चालू होती. रुमानियामध्यें बरेंच ब्रिटिश भांडवल गुंतलेलें आहे आणि त्या राष्ट्रास स्वतःची तटस्थ वृत्ति अबाधित राखण्याचे कामीं सहाय देण्याचें आश्वासन ग्रेटब्रिटननें दिलें होतें. हंगेरी आणि बल्गेरिया ह्या राष्ट्रांची रुमानियाचे कांहीं प्रदेश आपणांस मिळावे ह्याविषयीं मागणी होती. त्यासंबंधांत रुमानियन सरकारनें कांहींच तडजोड केली नाहीं. ही संधि हिटलर व व मुसोलिनी ह्यांनीं साधली. हंगेरी व बल्गेरिया ह्यांचे वतीनें त्यांनीं आपली मध्यस्थी रुमानियावर लादण्याचा प्रयत्न केला आणि त्यांत त्यांच्या कारवायांस यश आलें आहे. रुमानियामध्यें अंतस्थ कलह धुमसत होतेच आणि त्याचा फायदा हिटलरनें करून घेतला आहे. ह्या धडामोडीमध्यें राजे कॅरोल ह्यांस राज्यत्याग करावा लागला असून रुमानियांतली सत्ता राजपुत्र मायकेल ह्यांच्याकडे नामधारी रीतीनें गेली आहे. खरा सत्ताधीश मुख्य प्रधान असून त्यानें आपलें राष्ट्र उघड रीतीनें जर्मनीच्या स्वाधीन केलें आहे. ह्याप्रमाणें रुमानियन राष्ट्र जर्मनीच्या कारवायांस बळी पडलें असून युरोपांतील आणखी एका राष्ट्राचें स्वातंत्र्य नष्ट झालें आहे. हिटलर व मुसोलिनी ह्यांच्या जाळयांत दुसरीं कोणतीं बाल्कन राष्ट्रें सांपडतात आणि ग्रीसचें पुढें काय होतें इकडे जगाचे डोळे लागले आहेत.

## जपानमधील कारखाने

जपानमध्यें एकूण १ लक्ष १२ हजार कारखाने असून त्यांत २२ लक्ष १५ हजार कामगार आहेत. ह्या कारखान्यपैकी ८९% कारखाने छोटेखानी असून त्यांतील कामगारांची संख्या २९·१%, मध्यम आकाराच्या कारखान्यांची संख्या १२·२% व त्यांतील कामगारांची संख्या २६·२% आहे. म्हणजे एकूण कारखान्यपैकी मोठे कारखाने फक्त १·८% आहेत व त्यांत एकूण कामगारांपैकी ४७·६% कामगार कामावर आहेत. एकूण उत्पादन १०० समजल्यास त्यापैकी १७·५ उत्पादन छोटेखानी कारखान्यांत, २५·२ उत्पादन मध्यम आकाराच्या कारखान्यांत व ५७·२ उत्पादन मोठ्या कारखान्यांत होतें. जपानची औद्योगिक रचना वरीलप्रमाणें असल्याकारणानें, मोठ्या प्रमाणावरील उत्पादन वाढविणें तात्काळ शक्य होत नाहीं; लहान कारखान्यांकरवींच कामें करून घ्यावीं लागतात. अर्थात्, कांहीं बाबतींत लहान कारखाने मोठ्या कारखान्यांपेक्षा अधिक कार्यक्षम असूं शकतात. खेडेगांवांतून पसरलेल्या लोकांसहि औद्योगिक उत्पादनास हातभार लावतां येतो, हाहि त्यांत एक फायदा आहे.

## कर्जाची परतफेड

१९४०–४३ मध्यें परत फेडावयाचें ५% चें हिंदुस्थान सरकारचें सर्व कर्ज १ ऑक्टोबर, १९४० रोजीं रोखे धारण करणारांस परत दिलें जाईल. १ ऑक्टोबर नंतर व्याज चालू रहाणार नाहीं.


## कंपनी कायद्याखालीं खटला

### खोटा ताळेबंद

आर. डी. क्रेअर नांवाच्या मनुष्यानें इंडिया सिनेटोन लि. नांवाची मुंबई येथें एक कंपनी काढली. तिचें मूळ अधिकृत भांडवल २½ लक्ष रुपये होतें. क्रेअरनें लोकांस कित्येक शेअर्स विकले व १५ डिसेंबर, १९३६ अखेरच्या ताळेबंदांत ३९,९२० रुपयांचे भाग खपलेले दाखविण्यांत आले होते. आठ लोकांनींच ३७ हजारांचे भाग घेतले होते व क्रेअरनें दिलेल्या गैरमाहितीमुळें त्यांनीं ते घेतले, अशी त्यांची तक्रार होती. कंपनीच्या पैशाचा विनियोग क्रेअरनें नीट केला नाहीं, त्याची त्यानें अफरातफर केली, कंपनीच्या हिशेबाचीं पुस्तकें जाग्यावर नव्हतीं, इत्यादि तक्रारीहि कंपन्यांच्या रजिस्ट्रारकडे गेल्या. २७ जुलै, १९३७ रोजीच्या एका ठरावानें कंपनीनें आपखुषीनें आपलें लिक्विडेशन करण्याचें ठरविलें, त्या पूर्वी एक महिना क्रेअरनें कंपनीच्या हिशेबाच्या वह्या चोरीस गेल्याचें पोलिसला कळवलें होतें. रजिस्ट्रार ऑफ कंपनीजच्या सांगण्यावरून त्याचेवर मुंबईच्या चीफ प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेटचे कोर्टांत इंडियन कंपनीज ॲक्टाच्या २८२ व्या कलमाखालीं खटला भरण्यांत आला. खोटा ताळेबंद नोंदविल्याचा त्याचेवर आरोप ठेवण्यांत आला. मॅजिस्ट्रेटनें आरोपीस एक वर्ष सक्त मजुरीची शिक्षा ठोठावली. आरोपीनें कंपनीचे नांवाखालीं आपणच एकट्यानें सर्व गोष्टी केल्या व अनेक लोकांस फसवून त्यांचेकडून पैसे काढले, असे त्याच्याबद्दल मॅजिस्ट्रेटनीं उद्गार काढले.


# फॅन्सी रिस्ट वॉचेस

फुकट फुकट फुकट




१९४० चें मॉडेल ऑटोमॅटिक रिव्हॉल्व्हर

लायसेन्सची जरूर नाहीं

रिव्हॉल्व्हरचा आकार वरील चित्रांत दाखवल्याप्रमाणें आहे. खऱ्याखुऱ्या रिव्हॉल्व्हरप्रमाणें दिसण्यांत असून ह्याचा तसाच आवाज होतो. ह्याचें वजन १५ औंस आणि लांबी ७ इंच आहे. नळीमध्यें ६ काडतुसें राहतात आणि तीं एकामागून एक उडवतां येतात. ह्याच्या मोठ्या आवाजानें जंगली श्वापदेंहि घाबरून पळतात आणि चोर व शत्रू ह्यांपासून रक्षणास तो उपयोगी आहे. ७७७ नंबरच्या रिव्हॉल्व्हरची किंमत ४ रु. ८ आणे आहे आणि त्याच्या बरोबर १५ काडतुसें असतात. नं. ८८८ चें रिव्हॉल्व्हर उत्तम पोलादाचें असून त्याची किंमत ५ रु. ११ आणे आहे. त्याच्याबरोबर ७५ काडतुसें येतात. जादा १,००० काडतुसांची किंमत ३ रु. पट्टयासह पेटीची किंमत १ रु. १२ आणे. रिव्हॉल्व्हरसाठी तेल कि. १२ आणे. टपाल हशील वेगळें.

फुकट—प्रत्येक रिव्हॉल्व्हर बरोबर दोन फॅन्सी रिस्ट वॉचेस फुकट बक्षिस दिलीं जातात. तीन रिव्हॉल्व्हर एकदम घेणारास सहा पट्यांचें बक्षिस आणि टपाल हशील माफ.

पत्ताः—अमेरिकन पिस्तुल कंपनी
पोस्ट बॉक्स नं. २७ (A. P.) अमृतसर (India.)

# सहकारी शेत-माल विक्रीच्या व्यवस्थेचें शिक्षण

### प्रो. काळे ह्यांच्या हस्तें वर्गाचें उद्घाटन

मुंबई प्रांतांतील सहकारी बँकांची मध्यवर्ती संस्था स्थापन होऊन त्या बँकांच्या कारभाराबाबतच्या प्रश्नाची चर्चा व निकाल करण्याचें तिचें कार्य व्यवस्थित रीतीनें चाललें आहे. शेतीच्या मालाच्या विक्रीचें शिक्षण देण्याचा वर्ग पुणें येथें बँकांच्या अधिकारी वर्गाच्या सोयीसाठी चालवण्याचें ह्या मध्यवर्ती असोसिएशननें ठरवलें आणि त्या योजनेस प्रांतिक सरकारचें सहाय मिळून त्या उपक्रमाचा प्रारंभ गेल्या शनिवारीं सायंकाळीं प्रो. काळे ह्यांचे हस्तें करण्यांत आला. इलाखा सहकारी बँक व सेंट्रल बँका ह्यांनीं आपल्या अधिकाऱ्यांस शिक्षणासाठी पाठवलें असून एक महिन्याच्या तात्त्विक व व्यावहारिक स्वरूपाचा अभ्यासक्रम आखलेला आहे. शिक्षणाचें काम तज्ञांकडे सोंपवलें असून वर्गाची व्यवस्था श्री. रमणिकराय मेथा पहात आहेत. सुरत, मुंबई, पुणें, गदग इत्यादि ठिकाणीं विद्यार्थ्यांस मालविक्रीच्या व्यवस्थेची प्रत्यक्ष माहिती देण्यांत येईल आणि वर्गाचें काम एक महिनाभर चालेल. अखेर परीक्षा घेतली जाईल. वर्गाचा सर्व खर्च सोसण्याचें सरकारनें कबूल केलें आहे.

उद्घाटनसमारंभास सहकारी खात्याचे प्रमुख, श्री. मणसाळी, असोसिएशनचे चिटणीस श्री. वैकुंठराय मेथा, असिस्टंट रजिस्ट्रार्स श्री. भागवत व कुलकर्णी, प्रो. घाटगे, श्री. दामूअण्णा पोतदार, सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. चितळे, श्री. नानासाहेब गुप्ते इत्यादि मंडळी उपस्थित होती. प्रारंभीं श्री. वैकुंठराय मेथा ह्यांनीं उपस्थित मंडळींचें स्वागत केलें आणि सहकारी बँकांच्या असोसिएशननें चालवलेल्या कामाची माहिती सांगितली. प्रस्तुत वर्ग काढण्याच्या कल्पनेचा उगम कसा झाला हें सांगून श्री. मणसाळी ह्यांनीं केलेल्या सहायाचा त्यांनीं निर्देश केला. त्याचप्रमाणें, ज्या शिक्षक मंडळींनीं (अधिकारी व बिनअधिकारी) वर्गाचे संबंधांत सहकार्य केलें आहे, त्यांस त्यांनीं धन्यवाद दिले.

### प्रो. काळे ह्यांचें भाषण

"शेतमालाच्या किफायतशीर व संघटित विक्रीचें महत्त्व अनेक कमिट्यांनीं आजवर केलें असलें तरी विशिष्ट कारणांमुळें त्या प्रश्नास विशेष चालना मिळाली नाहीं. आर्थिक मंदीमुळें शेतकरीवर्गाची हलाखी उडाली आणि त्याच्या कर्जाच्या निवारणाचें अगत्य तीव्रतेनें भासूं लागलें. मालविक्रीच्या कांहीं संस्था अस्तित्वांत असल्या तरी एकंदरीनें पतपेढ्यांनीं द्यावयाच्या कर्जाकडे जेवढें लक्ष देण्यांत आलें तेवढें तें शेतकरी सभासदांच्या मालाच्या विक्रीचे व्यवस्थेकडे देण्यांत आलें नाहीं. शेतकऱ्यांच्या सर्व व्यवहारांची घटना सहकारी पद्धतीनें होण्याचें महत्त्व अलीकडे सरकारास पटलें असून मल्टिपर्पज सोसायटीज स्थापण्याचा प्रयत्न सध्या चालू आहे. ह्या संस्थांनीं शेतकऱ्यांच्या डोक्यांवरचा कर्जाचा बोजा हलका केल्यावांचून त्यांचा धंदा चालणें अशक्य आहे असें निदर्शनास आल्यावरून मुंबई सरकारनें त्या संबंधांत एक खास कायदा केला आहे हें सर्वविश्रुतच आहे. सहकारी संस्था किंवा इतर विशिष्ट व्यवस्था ह्यांचे मार्फतच शेतकऱ्यांनीं आपला माल विकला पाहिजे अशी अट त्यांत घातलेली आहे. तिचा उद्देश उघड आहे. मालविक्रीचे व्यवहार ह्या कायद्याप्रमाणें प्रचंड प्रमाणावर व्हावयाचे आहेत, त्यांची व्यवस्था करण्याचें अवघड कार्य सरकार व सहकारी कार्यकर्ते ह्यांचे पुढें आहे. ही सर्व परिस्थिति लक्षांत घेतली असतां शेतमालाच्या विक्रीचा प्रश्न किती तातडीचा आहे ह्याचें विवेचन विस्तृत रीतीनें करण्याचें कारण नाहीं. कार्यक्षेत्र फार विस्तृत असलें, तरी त्यांतला स्वतःचा भाग उचलण्याचें सहकारी बँकांनीं ठरवलें. सरकारनें द्रव्यसहाय दिल्यास आपण आपल्या अधिकाऱ्यांस विक्रीच्या व्यवस्थेचें शिक्षण देण्याची तजवीज करूं असें त्यांनीं सुचवलें. रजिस्ट्रार श्री. मणसाळी ह्यांच्या सहानुभूतीनें ह्याप्रमाणें प्रस्तुत वर्गाचा उपक्रम करण्यांत आलेला आहे.

"शेतकऱ्यानें आपल्या सहकारी संस्थेच्या मार्फत विक्रीचा व्यवहार केला असतां त्यांत त्याची कशी बचत आहे हें कित्येकांच्या लक्षांत येत नाहीं. बँकेनें दिलेल्या कर्जाची वसुली त्या योगानें सुकर रीतीनें होते, ह्यांतहि शेतकऱ्यांचें हित आहे. कर्जवसुली व कर्जफेड ह्या दोन गोष्टी वस्तुतः एकच असून त्या दुहेरी फायदेशीर व सोईस्कर आहेत. आपल्या शाखा व त्यांच्या आसपासचे टापू ह्यांचे मधील शेतकऱ्यांच्या मालाच्या विक्रीची व्यवस्था करण्याचें बँकांनीं ठरवलें आहे, पण हें काम जबाबदारीचें व जोखमीचें आहे. त्यावर बँकांनीं अनुभवी व विश्वासू अधिकाऱ्यांची नेमणूक केली पाहिजे. शेतीचा निरनिराळ्या जातींचा माल आणि निरनिराळे टापू ह्यांची परिस्थिति भिन्न असते. ह्या कारणानें मालाच्या विक्रीची व्यवस्था हें अवघड काम आहे आणि त्या विक्रीच्या पद्धतीचीं मूलभूत तत्त्वें समजणें अत्यंत अगत्याचें आहे. म्हणूनच ह्या वर्गांत तात्त्विक व व्यवहारिक हीं दोन्ही अंगें संभाळण्यांत येणार आहेत. विद्यार्थ्यांस माझें असें सांगणें आहे कीं त्यांनीं आपलें काम मन लावून करावें. मालविक्रीच्या व्यवहाराचें तात्त्विक व व्यावहारिक ज्ञान त्यांनीं करून घेतल्यास निरनिराळ्या परिस्थितींत त्यांस त्याचा उपयोग करतां येईल. मालविक्रीच्या कामांत पडणारांस सचोटी व प्रामाणिकपणा तर अवश्यच हवा, पण त्याबरोबरच त्या कामाची सोपपत्तिक माहिती पाहिजे. तरच विस्तृत संघटनेचें पुढचें काम त्यांचे हातून नीट घडेल. शेवटीं श्री. मणसाळी ह्यांची शांत वृत्ति व मनमिळाऊपणा आणि बिनसरकारी कार्यकर्त्यांशीं सहानुभूतीनें वागण्याची तऱ्हा ह्यांचे योगानें बँकांच्या मध्यवर्ती संस्थेस जें उत्तेजन मिळत आहे त्याचा साभार व गौरवपूर्ण निर्देश करणें अगत्याचें आहे. ह्या वर्गांतील शिक्षणाचा बँका व त्यांचे अधिकारी यांस चांगला उपयोग होवो अशी इच्छा प्रदर्शित करून वर्ग चालू झाल्याचें मी जाहीर करतों."

### श्री. मणसाळी ह्यांचें भाषण

प्रो. काळे ह्यांच्या विनंतीवरून श्री. मणसाळी यांनीं त्यानंतर खालीलप्रमाणें भाषण केलें:—"मालविक्रीचा प्रश्न एवढा महत्त्वाचा असूनहि त्याची आजवर हेळसांड कां झाली, ह्याचा विचार करण्यासारखा आहे. मालाच्या तारणावर कर्जें देण्याचा उपक्रम ह्या प्रांतांत चालू करण्यांत आला आणि त्याकडे इतर प्रांतांचें लक्ष आहे. शेतकरी कर्ज-निवारणाच्या कायद्याचा प्रो. काळे ह्यांनीं उल्लेख केला. त्याच्या अंमलबजावणींत सहकारी संस्थांस महत्त्वाचें कार्य करतां येईल. मालविक्रीचाहि कायदा पास झालेला आहे आणि त्याचे नियम प्रसिद्ध झाले म्हणजे त्यांचे बाबतींतहि सहकारी पद्धतीच्या विक्रीचा मोठा उपयोग होणार आहे. सुमारें ५२ मल्टिपर्पज सोसायट्या स्थापन झाल्या आहेत. त्यांची यशस्विता पद्धतशीर विक्रीवर अवलंबून राहील. ह्या वर्गांतील शिक्षणाचें महत्त्व किती आहे हें प्रो. काळे ह्यांनीं सांगितलेंच आहे. सेंट्रल बँकांनीं उत्साहानें हा प्रश्न हातीं घेतला हें अभिनंदनीय आहे. सरकारनें विक्रीच्या व्यवस्थेस संघटित स्वरूप देण्यासाठी इन्स्पेक्टर्स नेमले असून ह्या कार्याचा विस्तार होणार आहे. त्यास ह्या वर्गाचें कार्य पोषक होईल अशी मला खात्री आहे."

## पायोनियर डाइंग हाउसचा १८ वा वाढदिवस

### मालाचें सुंदर प्रदर्शन

श्री. द. वा. फाटक ह्यांच्या रंगाच्या कारखान्याचा १८ वा वाढदिवस. गेल्या गुरुवारीं मोठ्या थाटानें श्री. बापूसाहेब गुप्ते ह्यांच्या अध्यक्षतेखालीं साजरा करण्यांत आला. ह्या प्रसंगीं अनेक निमंत्रित पुढारी मंडळी उपस्थित होती. प्रथम कारखान्याचा वृत्तांत निवेदन करण्यांत आला आणि प्रो. केशवराव कानिटकर, श्री. केळकर, ( सरकारी खात्यांतील विणकामासंबंधांतील अधिकारी ) श्री. शंकरराव ढाते, श्री. खरे ह्यांचीं भाषणें झालीं. त्यांमध्यें श्री. फाटक ह्यांचें अभिनंदन करण्यांत आलें आणि त्यांनीं आपल्या धंद्यांत प्रकट केलेल्या सचोटी, चिकाटी व सुस्वभाव इत्यादि गुणांचा गौरव करण्यांत आला. अध्यक्ष श्री. बापूसाहेब गुप्ते ह्यांनीं समयोचित भाषण करून हिंदुस्थानांत लहान प्रमाणावरील धंद्यांचें महत्त्व किती मोठें आहे हें सांगून व्यापारी व्यवसायांत सचोटीचा गुण असण्याचें आगत्य प्रतिपादलें. वंदेमातरम् गीत व पानसुपारी होऊन समारंभ समाप्त झाला. पायोनियर डाइंग हाउसच्या विविध प्रकारच्या मालाचें प्रदर्शन कारखान्याच्या जागेंतील मांडवांत मांडण्यांत आलें होतें.

---

## मुंबईच्या बाजारांतील घडामोडी

### अँग्लो-अमेरिकन तह

ग्रेट ब्रिटन व अमेरिका ह्यांचेमध्यें गेल्या आठवड्यांत तह होऊन, ग्रेट ब्रिटननें पश्चिम गोलार्धांतील आपले कांहीं आरमारी व वैमानिक तळ हीं अमेरिकेस खंडानें दिलीं व त्यांचे मोबदल्यांत ५० विनाशिका घेतल्या. अमेरिका व इंग्लंड ह्यांचेमधील हा तह ह्या दोन राष्ट्रांस आणखी जवळ आणील, व जर्मनीचा प्रतिकार करण्याचें इंग्लंडचें सामर्थ्य त्यामुळें वाढेल. ही घटना व्यापारविषयक अनिश्चिततेच्या दृष्टीनें महत्त्वाची आहे. रुमानियांतील उलाढालींचें स्वरूप मात्र वरील घटनेच्या उलट स्वरूपाचें आहे. जपानचे पूर्व आशियांतील धोरणाचाहि बाजारावरील परिणाम लक्षांत घेतला पाहिजे.

### पैशाची विपुलता

मुंबईच्या बाजारांत पैशाची विपुलता कायम होती. कॉल-मनीचा दर ½% होता. रिझर्व्ह बँकेकडील शेड्यूल्ड बँकांच्या बिनव्याजी ठेवी वाढत आहेत, ह्या वरून व्यापारांत तेजी नाहीं, असें अनुमान निघतें. सरकारनें रिझर्व्ह बँकेची ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शें १० आ. ७ पै पडला.

### सरकारी रोखे

सरकारी रोखपोच्या किंमतींत किंचितशी वाढ झाली. मध्यम मुदतीच्या रोख्यास विशेष मागणी होती.

### सोनें-चांदी

सोन्याचा जास्तींत जास्त अधिक दर, तोळयास ४२ रु. ८ आ. ६ पै व कमींत कमी दर, ४२ रु. १ आ. होता. चांदीचा प्रत्येक १०० तोळयांचा भाव अनुक्रमें ६१ रु. १० आ. व ६१ रु. ४ आ. ६ पै होता.


**अर्थशास्त्र**

लेखक—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे

पृष्ठसंख्या सुमारें ५००, किंमत ३ रुपये

या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

---

**ग्राम स्फूर्ति** मासिक वर्ष ९ वें. वा. व. म. आ. नें २ रु. शेतकऱ्यांचा जीवलग मित्र, ग्रा. पंचा. मार्गदर्शक, ग्रामसंस्थांना उत्साहप्रद, विद्यार्थ्यांना उद्बोधक, व्यापारी मालाचा प्रसारक, मुंबई व मध्यप्रांत विद्याखात्याकडून मंजूर.

श्री. ना. सुद्दार, सं. ग्रा., नागपूर.

---

"गेले ते दिवस—
तारुण्याची बहार ओसरली
आणि खर्च कां इतकी
आजीबाई दिसतें?"

असे उद्गार साधनेच्या तोंडून बाहेर पडले याला कारण—

**लपंडाव**

नवयुग चित्र

नवयुगचा मराठी बोलपट

**मिनर्व्हा—पुणें.**

४ था आठवडा

शिवाय—
मुंबई, कोल्हापूर, ग्वाल्हेर, बेळगांव येथें सुरू आहे.

---

सर्व तऱ्हेचें कापड छापणें व रंगविणें (Calico Priuting and Dyeiug) करणारा कारखाना.

**'पायोनियर डाइंग हाऊस'**

कोटाचें कापड (Casement cloth) खास वे पडदे, टेबल कव्हर इ. टिकाऊ रंगाचे, स्वदेशी तयार मिळतात. कारखाना—

भिकारदास मारुती रोड, शुक्रवार, पुणें.

# सहकारी बँकांचे अहवाल

## राजवाडे मंडळ पीपल्स को. बँक लि, धुळें

अहवालाचे साल अखेर ह्या बँकेच्या पटावर १,३८९ सभासद असून त्यांनीं ४३ हजार रुपये भांडवलांत गुंतविलेले आहेत. रिझर्व्ह फंडांत ८½ हजार रुपये, बुडीत व संशयित कर्जफंडांत ६½ हजार रुपये, ग. प्रॉ. नोट डिप्रि. फंडांत १ हजार रुपये, वगैरे प्रमाणें रकमा आहेत. बँकेकडे एकूण २ लक्ष, ७ हजार रुपयांच्या ठेवी आहेत. बँकेनें सभासदांना १ लक्ष, ५४ हजार रुपयांचीं कर्जे दिलेलीं आहेत. कर्जदार सभासदांकडे ८१⅓ हजार रुपये थकबाकी आहे, त्यांपैकी ६०⅓ हजारांचे हुकूमनामे झालेले आहेत. सरकारी व तत्सम रोख्यांत बँकेनें ५० हजार रुपये गुंतविलेले आहेत, त्यांचा तपशील (दर्शनी किंमत, मूळ पडलेली किंमत, ताळेबंदाचे दिवशीं बाजारभावानें होणारी किंमत इ.) दिला असता, तर बरें झालें असतें. वाटणीसाठी ५, ८८० रुपये नफा राहिला, त्यांतून भागिदारांस ५ टक्के दरानें डिव्हिडंड जाहीर करावें, म्हणजे बायलॉ ४१ अ (१) प्रमाणें राजवाडे संशोधन मंडळास ६५० रुपये मिळतील, अशी व्यवस्थापक मंडळाची शिफारस आहे. सरकारी रोख्यांच्या डिप्रिसिएशन फंडांत १,०२५ रुपये टाकावयाचे आहेत. कै. विश्वनाथ काशिनाथ राजवाडे ह्या इतिहासाचार्यांच्या स्मारकाचें काम करण्यासाठी राजवाडे संशोधन मंडळ स्थापन झालें. मंडळाच्या कांहीं प्रमुख सभासदांनीं वरील बँकेची स्थापना करून बँकेच्या भागीदारांस दरसाल मिळणाऱ्या व्याजापैकी कांहीं अंश मंडळाच्या कार्यास मिळावा, ह्या हेतूनें बँकेची घटना केली. बँकेकडून मिळणाऱ्या पैशाचा उपयोग राजवाडे संशोधन मंडळाच्या प्रकाशनाच्या कार्याकडे केला जातो. अशा प्रकारचें बँकेचें वैशिष्ट्य आहे. बँकेची वार्षिक सभा २२-९-४० रोजीं आहे.

---

## धुळें अर्बन को. बँक लि.

वरील बँकेचें वसूल भांडवल ९१,१४० रुपये असून तें १,४६९ सभासदांत वाटलें गेलेलें आहे. बँकेच्या रिझर्व्ह फंडांत सुमारें ६७ हजार रुपये व इतर फंडांत ५५¾ हजार रुपये आहेत. बँकेकडे एकूण ३ लक्ष, ८०½ हजारांच्या ठेवी आहेत. बँकेजवळ रोख, इतर बँकांत शिलक, सरकारी नोटा, डिबेंचर्स वगैरेंत मिळून २ लक्षांपेक्षा अधिक रुपये तरते आहेत, ही समाधानकारक परिस्थिति आहे. बँकेचें सभासदांकडून एकूण ४ लक्ष, ५ हजार रुपये येणें आहे. थकलेली बाकी १ लक्ष, १९½ हजार रुपये असून त्यापैकी १ लक्ष १५ हजारांचें हुकूमनामे झालेले आहेत. वर्षअखेर, मागील शिलक नफा धरून, १३,१३८ रु. नफा झाला, त्यांतून भागीदारांस ७½% दरानें डिव्हिडंड देण्याकडे ६, ३१४ रुपयांचा विनियोग करावा अशी मॅनेजिंग कमिटीची शिफारस आहे. बँकेचे रिझर्व्ह व इतर फंड मजबूत आहेत; तरी पण डिव्हिडंडचा दर (७½ %) सध्यःस्थितींत जरा भारी वाटतो.

---

## अमळनेर को. अर्बन बँक लि.

वरील बँकेच्या १,०५२ सभासदांचें भरणा झालेलें भांडवल ४८,५४० रुपये आहे. रिझर्व्ह फंडांत ६० हजार रुपये असून बुडीत व संशयित कर्जांची तरतूद २७½ हजार रुपये आहे. बिल्डिंग फंड २७ हजारांचा, डिव्हिडंड ईक्वलायझेशन फंड २¾ हजारांचा व कॅपिटल प्रॉफिट ॲन्ड लॉस अकाउंट फंड १¾ हजारांचा आहे. बँकेकडे एकूण ३ लक्ष, ८०¼ हजारांच्या ठेवी आहेत. बँकेच्या जिंदगींचे बाजूस ४६⅓ हजार रुपये रोख व बँकांचे खात्यांवर; ३०½ हजार रुपयांचे सहकारी बँकांचे भाग, रिझर्व्ह बँकेचे ५ भाग व सरकारी रोखे (२२½ हजारांचे); कायम ठेवींत ७० हजार रुपये, ३ लक्ष २४ हजारांचीं कर्जे वगैरे बाबी आहेत. थकबाकीची रकम ४९½ हजार रुपये आहे, त्यांतील लवादी रकम २६⅓ हजार रुपये आहे. व्यापारी मेंबरांच्या रासिदीचा व्यवहार ह्या वर्षीं बऱ्याच प्रमाणांत वाढला आहे. वर्षअखेर बँकेस १५,४६४ रुपये नफा झालो, त्यांतून भागीदारांस ७½ % दरानें डिव्हिडंड देण्याकडे ३,५८२ रुपयांचा विनियोग करावा, अशी बोर्डाची शिफारस आहे. डिव्हिडंडचा दर इतर सहकारी बँकांनीं उतरविला आहे, तेव्हां अंमळनेर बँकेचा दर जरा अधिक वाटतो. बँकेची वार्षिक सभा ता. २२-९-४० रोजीं होणार आहे.

---

## कॉसमॉस को. अर्बन बँक लि.

वरील बँकेचे पटावर २,२०० सभासद असून त्यांनीं ८९,४६० रुपयांचे भाग घेतले आहेत. अहवालाच्या वर्षीं व्याजाच्या दरांत कोणत्याहि प्रकारचा फरक न होतांहि ठेवींच्या रकमेंत १ लक्ष, १३⅓ हजार रुपयांची भर पडून ती ५ लक्ष, ५५ हजार रुपयांची झाली आहे, ही गोष्ट उल्लेखनीय आहे. ३७½ हजार रुपये गंगाजळी ठेव, ३ हजार रुपये जनरल फंड, ७ हजार रुपये इमारत फंड, ½ हजार रुपये घसारा फंड, ½ हजार रुपये डिव्हिडंड फंड, २ हजार रुपये बुडीत–संशयित कर्ज रिझर्व्ह, १½ हजार रुपये संशयित व्याज रिझर्व्ह, वगैरे फंड आहेत. सभासदांकडून कर्जमागणी फार नव्हती. कर्जवसुली समाधानकारक झाली. सालअखेर २०⅓ हजार रुपये थकबाकी असून तिचें शेकडा प्रमाण ६·२% पडतें. "अहवालाचे सालीं एकूण १८ सभासदांवर हुकूमनामे झाले. यांपैकीं एकहि हुकूमनामा बँकेला सालअखेरपर्यंत सहकारी खात्याकडून मिळाला नाहीं. अशा प्रकारें सहकारी खात्याकडून हुकूमनामें मिळणेबाबत बराच अवधी लागल्यामुळें बँकेला ह्या हुकूमनाम्यांचे बजावणीचें काम करतां आलें नाहीं व त्यामुळें थकबाकीचें प्रमाण अहवालाचे सालीं वाढलें आहे. सहकारी खात्याकडून लवाद प्रकरणीं योग्य ती मदत वेळेवर मिळाल्यास बँकेचें वसुलीचें काम बरेंच सुकर होईल व थकबाकीचें प्रमाण कमी होण्यास मदत होईल" असा अहवालांत शेरा आहे. थकबाकीचें प्रमाण अति अल्प असलेल्या बँकेच्या ह्या शेऱ्याकडे सहकारी खात्याचें लक्ष जाऊन तिची तक्रार दूर होईल, अशी आशा आहे. कर्ज-वसुलीचे बाबतींत दिरंगाई होण्यास सहकारी खातेंहि थोडेंफार कारणीभूत होणें इष्ट नाहीं. बँकेच्या पैशापैकीं बराच मोठा भाग रोख, इतर बँकांत, रोख्यांत, शेअर्समध्यें वगैरे प्रमाणें तरता आहे. अहवालाचे वर्षीं बँकेस ९,१२१ रुपये नफा झाला. त्यांतून भागीदारांस ६½% दरानें डिव्हिडंड देण्यासाठी ५,५०५ रुपयांचा विनियोग करावा अशी बोर्डाची शिफारस आहे. बँकेची वार्षिक सभा २९-९-४० रोजीं आहे.

---

## मुंबई बंदराचा गळिताच्या धान्यांचा व्यापार

फार पुरातन काळापासून हिंदुस्थानची भुईमूग व भुईमुगाचें तेल, अळशी व अळशीचें तेल, मोहरीचें व करडईचें तेल याबद्दल प्रसिद्धि आहे. मुंबई बंदर खात्यानें तेलाची ने-आण करणें व सांठा करणें याबाबत बऱ्याच सोई केल्या आहेत. गेल्या वीस वर्षांची सरासरी घेतल्यास गळिताचीं धान्यें व पेंड यांची मुंबई बंदरांतून वार्षिक निर्गत ५ लक्ष टनांवर होते व तिची किंमत ६½ कोटि रुपयांपेक्षा अधिक भरते. इतर दुसऱ्या कोणत्याहि बंदरापेक्षां मुंबई बंदरांतून गळिताचीं धान्यें व तेलें यांची निर्गत कितीतरी अधिक होते.

त्यांच्या व्यापाराचें केंद्र मुंबईचा प्रसिद्ध दाणा बंदर होय. बी. बी. अँड सी. आय. व जी. आय. पी. रेल्वे आणि पोर्टट्रस्टचे गोदाम, दाणा व्यापारी संघ व बियाणें व्यापारी संघ यांच्या कचेऱ्या दाणाबंदरासच लागून आहेत. काळबादेवीलाहि कांहीं व्यापार चालतो. बाहेरून आलेला माल उतरवून घेऊन निरनिराळ्या व्यापाऱ्यांच्या गोदामांत ठेवणें, तेथें त्याची निवड व वजन करून पोत्यांतून भरणें, तीं पोतीं रेल्वेवर चढवून बंदराकडे नेऊन ठरलेल्या बोटींत तीं भरणें हीं सर्व कामें पोर्टट्रस्टच्या देखरेखीखालीं होतात. त्यामुळें त्रास टळून, वेळ वाचून, कमी खर्चानें बिनबोभाट कामें होतात व व्यापाराची सोय होते.

भुईमुगास गळिताच्या पदार्थांत महत्त्वाचें स्थान आहे. ब्राझील हा भुईमुगाचा मूळ देश असला तरी हिंदुस्थानची हवा त्याला चांगली मानवली असून त्याची पैदास होणाऱ्या देशांत हिंदुस्थानचा अनुक्रम पहिला लागतो. खानदेश, कारोमांडल, मुंबई व कऱ्हाड भुईमूग प्रसिद्ध आहेत. तेल गाळणें व त्यापासून पेंड तयार करणें या दोहोंकरितां भुईमुगाचा हिंदुस्थानांत व परदेशांत फार मोठ्या प्रमाणावर उपयोग केला जातो. हिंदुस्थानांत स्वयंपाकामध्यें तेलाचा उपयोग करतात; इतरत्र तें शुद्ध करून त्याची चरबी वापरतात. साबणाच्या धंद्यांत भुईमुगाचा बराच उपयोग करतात; हल्ली मात्र कमीदर्जाच्या तेलांचा उपयोग करण्याकडे प्रवृत्ति आहे. भुईमुगाची पेंड, गुरें व कोंबड्या वगैरेस खाण्यास चांगली असते. खताकडेहि तिचा उपयोग होतो.

अर्जेंटाइन दरसाल १९ लक्ष टनांवर अळशीची पैदास करतो. हिंदुस्थानातील वार्षिक उत्पादन ४½ लक्ष टन आहे. गुणानें हिंदी अळशी सरस ठरते. रंग आणि व्हार्निशें तयार करण्यांत अळशीच्या तेलाचा फार उपयोग होतो. तेली कापड, पेटंट कातडें ग्लिसरीन वगैरेंसाठीही या तेलाचा उपयोग करतात. मोहरीचें तेल बंगाल वगैरे प्रांतांत खाण्याकरितां वापरतात. वंगणाचें तेल, ग्लिसरीन साबण वगैरे करण्याकडे या तेलाचा उपयोग होतो. तिळाच्या तेलाचें महत्त्व भुईमुगामुळें हल्ली बरेच कमी झालें आहे. तथापि खाण्यांत त्याचा उपयोग होतो. केसांसाठी वापरण्यांत येणाऱ्या तेलांतहि याचा उत्तम प्रकारें समावेश होतो.

करडीच्या बिया पूर्वीपासून परिचित धान्य असून त्याचें उत्पादन १५ ते २० लक्ष टन प्रतिवर्षी होतें. पेंड म्हणूनहि तिचें महत्त्व आहे. करडईचें तेल निर्गतीच्या दृष्टीनें महत्त्वाचें नाहीं परंतु खाण्याकरितां व औद्योगिक क्षेत्रांत याचें महत्त्व बरेच आहे. याची पेंड गुरांस खाण्यास देण्यांत येते; खताकरितांहि उपयोग होतो. जवळजवळ १९३४ पर्यंत सार्‍या जगाला एरंडीच्या बियांचा पुरवठा हिंदुस्थानकडून होत असे. त्यानंतर जावा व ब्राझील यांची स्पर्धा तीव्रतेनें जाणवूं लागली आहे.

औषधीपणा, विमान-यंत्रांना उत्कृष्ट वंगण, कापडाच्या धंद्यांत व रंग खात्यांत उपयोग आणि कातड्याच्या धंद्यांतहि चांगला उपयोग इत्यादीमुळें एरंडीच्या तेलाला अतिशय महत्त्व आहे. त्याची पेंड मात्र खाणें शक्य नाहीं; तें धोक्याचें आहे. इंग्लंडमध्यें एका विशिष्ट प्रमाणाबाहेर (·००५%) एरंडीचें तेल असलेली भुईमुगाची अथवा अळशीची पेंड जनावरासहि खाण्यास नालायक ठरविण्यांत आली आहे. खताच्या दृष्टीनें मात्र ती चांगली ठरली असून उसाच्या लागवडींत तिचा मोठ्या प्रमाणावर खत म्हणून उपयोग करण्यांत येतो.

हिंदुस्थानांत आतां तेल गाळण्याचे अनेक कारखाने निघत असून तेलाच्या खपाचा प्रश्न उभा राहूं पहात आहे. त्याकरितां परदेशी बाजारपेठा काबीज करण्याचे प्रयत्न होणें आवश्यक आहे.

---


### कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि., पुणें.

## नोटीस

या बँकेची ३४ वी वार्षिक साधारण सभा रविवार ता. २९ सप्टेंबर १९४० रोजीं दुपारीं बारा वाजतां नूतन मराठी विद्यालय हायस्कूलचे असेंब्ली हॉलमध्यें भरणार आहे. त्यावेळीं सन १९३९-४० चा वार्षिक अहवाल, ताळेबंद, नफ्याची वांटणी मंजूर करणें, पुढील वर्षाकरितां सल्लागार-मंडळ, कार्यकारी-मंडळ, हिशेब-तपासनीस यांच्या निवडणुकी करणें व पोटनियम, प्रॉव्हि. फंड नियम, निवडणुकीचे नियम, नोकरीचे नियम, यांत सुचविलेल्या दुरुस्त्यांचा विचार करणें वगैरे कामें होतील. सभेस बँकेच्या सर्व सभासदांनीं अगत्य यावें अशी विनंति आहे.

बोर्ड ऑफ डायरेक्टर्सचे हुकुमावरून
मा. के. कुळकर्णी,
सेक्रेटरी.


---


## दि मुंबई प्रॉव्हिन्शिअल कोऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड

असें जाहीर करण्यांत येतें कीं या बँकेची २९ वी सर्वसाधारण सभा शनिवार, ता. २१ सप्टेंबर, १९४० रोजीं दुपारीं ३ वाजतां (स्टँ. टा.) बँकेच्या राजिस्टर्ड ऑफिसांत—९, बेक हाउस लेन, फोर्ट, मुंबई-खालील कामाकरितां भरेल:—

(१) ३० जून, १९४० रोजीं संपणाऱ्या वर्षाचा डिरेक्टरांचा रिपोर्ट व तपासलेले हिशेब स्वीकारणें.

(२) डिव्हिडंड ठरविणें.

(३) डायरेक्टर निवडणें.

(४) ऑडिटर्स नेमून त्यांचें वेतन ठरविणें.

(५) बँकेच्या बायलॉजमध्यें सुचविलेल्या दुरुस्त्यांचा विचार करून त्या योग्य वाटल्यास स्वीकारणें. दुरुस्त्यांचा तपशील सभासदांस पाठविण्यांत आला आहे.

बोर्डाच्या हुकुमावरून

मुंबई, ११ ऑगस्ट, १९४० — वैकुंठ ल. मेहता, मॅनेजिंग डिरेक्टर

भागांच्या तबदिलीचें काम (ट्रान्स्फर बुकें) २१ सप्टेंबर ते ४ ऑक्टोबर, १९४० पर्यंत (दोन्ही दिवस धरून) बंद राहील.

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट (२८ नोव्हेंबर, १९३५ पासून) | ३% |

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन (१९४५-५५) ... ... | ११२—० |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०४—६ |
| ३½% बिनमुदत ... ... ... ... | ९०—६ |
| ३½% १९४७-५० ... ... ... | १०१-१० |
| ३% (१९६३-६५) ... ... ... | ९०-१० |
| २¾% १९४८-५२ ... ... ... | ९५-१० |
| ४% पोर्ट ट्रस्ट (लांब मुदत) ... | १०३—८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल (लांब मुदत) ... ... | १०२—८ |
| ५% म्हैसूर कर्ज (१९५१-६१) ... ... | १०७—० |
| ५% म्हैसूर कर्ज (१९५५) ... ... | ११८—० |

### मंडळ्यांचे भाग

(कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००-५०) ११% ... ... | १३४—८ |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | १०१—४ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया (५०—२५) ८% ... | ३५—८ |
| इंपिरिअल बँक (५००) १२% ... ... | १४८१—४ |
| बाँबे प्रॉ. को. बँक (५०) ४% ... ... | ५३—० |
| रिझर्व्ह बँक (१००) ३½% ... ... | १०१—० |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. (५०) ११% ... ... | १२६-१२ |
| कराची (१००) ९% ... ... ... | १९७—८ |
| पुणें इलेक्ट्रिक (१००) ९% ... ... | १८२—८ |
| टाटा पॉवर ऑर्डि. (१०००) ५½% ... ... | १३६०—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. (१०००) ७½% ... ... | १५४२—८ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड-बारामती (१००) ४½% ... ... | ९३—० |
| पाचोरा-जामनेर (१००) ३½% ... ... | ६४—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) ११½% | १०२२—८ |
| तापी व्हॅली (५००) ८% ... ... ... | ७६३-१२ |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर (५०) ७ रु. ... ... ... | २००—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट (१००-५०) २ रु. ... ... | ४६—४ |
| सिंधिया स्टीम (१५) १ रु. ... ... ... | १९—१ |
| न्यू इंडिया विमा (७५-१५) १ रु. ... | ३८—० |
| ओरिएंटल विमा (२००) १२५ रु. ... | ३६४७—८ |
| टाटा आयर्न प. प्रे. (१५०) ६% ... ... | २०१-१२ |
| टाटा आयर्न दु. प्रे. (१००) १८ रु. १० आ. ... | १४०—४ |
| टाटा आयर्न ऑर्डि. (७५) १५ रु. ... ... | ३३४—० |
| टाटा आयर्न डिफर्ड (३०) ७५ रु. ११ आ. ३ पै. ... | १७३२—८ |
| असोसिएटेड सिमेंट (१००) ५ रु. ... | ११४—८ |

#### सोनें-चांदी

| | |
|---|---|
| सोनें (मिंट) प्रत्येक तोळ्यास ... ... | ४२-६-९ |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यांस ... ... | ६३-१२-० |


स्पृहणीय यश

**बोनसचे दरांत २० टक्के वाढ**

तारीख ३० एप्रिल १९३८ रोजीं झालेल्या मूल्यमापनाचा निकाल

| हयातीनंतरचे विम्यावर रु. ५४ | त्रैवार्षिक- दर हजारीं बोनस | हयातींतील विम्यावर रु. ४५ |
|---|---|---|

आजच "कॉमनवेल्थ" ची पॉलिसी घेऊन कंपनीचे उत्कर्षांत भागीदार व्हा.

**दि कॉमनवेल्थ ॲशुअरन्स कंपनी लि० पुणें**

लिहा अगर समक्ष भेटा.

श्री. रा. न. अभ्यंकर, बी. ए., एलएल. बी.
मॅनेजिंग एजंट.

सर्वत्र कार्यक्षम व विश्वासू एजन्ट आकर्षक अटींवर नेमणें आहेत.



**मधुमेहावरील औषध**

तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७

— मागविण्याचा पत्ता —

मॅनेजिंग डायरेक्टर, रुरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड
९२३ ए, सदाशिव, पुणें २.



**दहा हजार रुपयांचीं घड्याळें बक्षिस**

"औहरे हुस्न" ह्या आमच्या प्रसिद्ध रजिस्टर्ड औषधाच्या वापरण्यानें शरीराच्या कोणत्याहि भागावरील केस कांहींहि त्रास न होतां नाहींसे होतात आणि जन्मभर, पुन्हां कधींहि त्या ठिकाणीं ते येत नाहींत. औषध लावलेली जागा रेशमासारखी मऊ, नरम व सुंदर होऊन जाते. बाटलीची किंमत फक्त १ रु. १४ आणे. ह्या औषधाच्या प्रसिद्धी सातर प्रत्येक बाटलीबरोबर एक फॅन्सी रिस्ट वॉच फुकट पाठवण्यांत येतें. हें घड्याळ अत्यंत सुंदर व मजबुत आहे. सौंदर्य व मजबुती ह्या विषयींची दहा वर्षांची गॅरंटी देण्यांत येते आणि गॅरंटीचा करारनामा प्रत्येक घड्याळाबरोबर पाठवण्यांत येतो.

सूचना—माल पसंत न पडल्यास त्याची किंमत परत केली जाते. तीन बाटल्या एकदम घेणारांस टपाल हशील माफ आहे आणि तीन घड्याळें बक्षिस मिळतात.

पत्ताः—लंडन कमर्शिअल कंपनी
पोस्ट बॉक्स नं. २७ (A. P.) अमृतसर–Amritsar.




एजंट:—
महादेव गोविंद कुलकर्णी
किराणा व भुसार मालाचे व्यापारी
७८६ सदाशिव, पुणें शहर.

सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन
जर्निमन टेलर व्हा.
मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यांस
फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष
पराडकर टेलर्स ॲकेडिमी, ६७१ सदाशिव, पुणें.

'अर्थ' ग्रन्थमाला
बँका आणि त्यांचे व्यवहार
लेखक:—प्रो. वा. गो. काळे व श्री. श्री. वा. काळे
दुसरी आवृत्ति तयार झाली.

या पुस्तकांत बँकांची घटना, व्यवहार व कामकाजाची पद्धति यांचें सोपपत्तिक विवेचन अत्यंत सोप्या भाषेंत केलेलें असून बँकांनीं आपला व्यवहार सुरक्षितपणें व फायदेशीर रीतीनें कसा करावा या बाबतींत अनेक महत्त्वाच्या व उपयुक्त सूचना केल्या आहेत. चलन, हुंडणावळ, आधुनिक तऱ्हेच्या बँका, मध्यवर्ती बँका, सहकारी बँका, सावकारी धंदा, ठेवी, डिस्कौंट व कर्जें इत्यादि महत्त्वाच्या प्रचलित व व्यावहारिक विषयांची सांगोपांग चर्चा त्यांत आली आहे. सध्याच्या परिस्थितींत प्रत्येक महाराष्ट्रीय नागरिकास वरील प्रश्नांची माहिती अत्यावश्यक असल्यानें मुद्दाम त्यांचें बोधप्रद विवेचन या पुस्तकांत केलें आहे. विषयाची मांडणी व विवेचनपद्धति सुलभ असल्यामुळें सदर पुस्तक सर्वसाधारण वाचकांसहि उपयुक्त होणार आहे. किंबहुना, त्यांचेकरितांच तें सहेतुक लिहिलें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. सबब, बँकांचे भागीदार, ठेवीदार, डायरेक्टर, गिऱ्हाइक, व्यवस्थापक आणि नोकर यांनीं विशेषतः हें पुस्तक अवश्य वाचावें.

दुसऱ्या आवृत्तींत आवश्यक त्या नवीन माहितीची भर घालणारीं अनेक प्रकरणें समाविष्ट केलीं असून रिझर्व्ह बँकेनें सुचविलेल्या कायद्याच्या मसुद्याचें विवेचनहि त्यांत आलेलें आहे.

किंमत १ रु. ८ आ. टपालखर्च वेगळा.

पुस्तकें मागविण्याचा पत्ता:—(१) व्यवस्थापक, अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.
(२) को-ऑपरेटिव्ह बुक डेपो, ९ बेक हाउस लेन, फोर्ट, मुंबई.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गानिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.